Publication: Maharashtra Times
Date: 27/07/2020

महाराष्ट्र टाइम्स

फोटो : प्रथमेश बांदेकर




**चित्रीकरणाला मिळालेल्या परवानगीनंतर आता चित्रपटगृहं सुरू कधी होतील याकडे संपूर्ण मनोरंजनसृष्टीचं लक्ष लागून राहिलं आहे. अनलॉकच्या तिसऱ्या टप्प्यात, ऑगस्ट महिन्यामध्ये थिएटर्स सुरू होण्याची शक्यता वर्तवली जातेय. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं त्यासाठी पुढाकार घेतलाय.**



# ऑगस्टमध्ये पडदा उघडणार?

## सिनेमागृहं खुली होण्याची शक्यता ■ माहिती-प्रसारण खात्याचा सरकारला सल्ला

मुंबई टाइम्स टीम
muntainbox@gmail.com

अनलॉकच्या पहिल्या दोन टप्प्यांमध्ये विविध उद्योग, व्यवसाय हळूहळू पुन्हा कार्यान्वित होताना दिसले. गेल्या काही दिवसांपासून मालिका-चित्रपटांचं चित्रीकरणही सुरू झालं आहे. आता अनलॉकच्या तिसऱ्या टप्प्यात, अर्थात पुढील महिन्यापासून सिनेमागृहं उघडण्यासाठी परवानगी मिळेल याकडे मल्टिप्लेक्स आणि सिनेमागृहमालकांचं लक्ष लागून राहिलं आहे. माहिती आणि प्रसारण खात्यानं केंद्रीय गृह मंत्रालयाला, ऑगस्ट महिन्यामध्ये सिनेमागृहं सुरू करण्याचा सल्ला दिला आहे.

गेल्या चार महिन्यांपासून चित्रपटगृहं बंद असल्यामुळे नवीन चित्रपटांचं प्रदर्शन खोळंबलं आहे. मनोरंजनसृष्टी नव्या जोमानं कार्यरत होण्यासाठी थिएटर सुरू व्हावी म्हणून सिनेमागृहमालक थिएटर उघडण्यासाठी परवानगीच्या प्रतीक्षेत आहेत. केंद्र सरकारनं अनलॉक संदर्भातील मार्गदर्शक सूचना यापूर्वी जाहीर केल्या होत्या; तेव्हा सिनेमागृहं अनलॉकच्या तिसऱ्या टप्प्यात कार्यान्वित करण्याविषयी सूतोवाच केलं गेलं होतं. म्हणून ऑगस्ट महिन्यात सुरू होणाऱ्या अनलॉक तीनच्या टप्प्यात थिएटर उघडण्याची परवानगी मिळेल या आशेवर देशभरातील सिनेमागृहांचे मालक आहेत.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव अमित खरे यांनी सीआयआय मीडिया समितीशी नुकतीच याबाबत बातचीत केली आहे. यात त्यांनी समितीला सांगितलं की, आगामी १ ऑगस्टपासून संपूर्ण देशात सिनेमागृहं सुरू करण्यासाठी केंद्र सरकारनं परवानगी द्यावी. अथवा किमान ३१ ऑगस्टपर्यंत तरी परवानगी देण्यात यावी, असा सल्ला त्यांनी केंद्रीय गृहमंत्रालयाला दिला आहे. या सल्ल्यावर केंद्रीय गृहमंत्रालय गांभीर्यानं विचार करत असल्याचं कळतंय. याबाबत अधिकृत माहिती केंद्रानं अद्याप जाहीर केलेली नाही. सिनेमागृह मालक अक्षय राठी सांगतात की, 'देशभरातील लाखो लोकांचा रोजगार हा सिनेमागृहांशी जोडला गेलेला आहे. त्यामुळे आता पुढे आणखी काही महिने सिनेमागृहं बंद ठेवून चालणार नाही. देशभरातील सिनेमागृहमालक आणि तिथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठ्या आर्थिक समस्यांना तोंड द्यावं लागत आहे. त्यामुळे केंद्रानं सिनेमागृह सुरू करण्याची परवानगी द्यावी अशी आमची इच्छा आहे. सिनेमागृहात प्रेक्षकांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्यासाठी आम्ही पूर्ण तयारी केली आहे.'

### माहिती आणि प्रसारण मंत्रालय काय म्हणतं?

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं सिनेमागृहांबाबत केंद्रीय गृह मंत्रालयाला दिलेल्या सल्ल्यात असं म्हटलं आहे की, चित्रपटगृह कार्यान्वित करताना प्रेक्षागृहात दोन प्रेक्षकांमध्ये एक आसन रिकामी ठेवावं. तसंच आसन व्यवस्थेच्या दोन रांगांमध्ये एक रांग रिकामी ठेवण्यात यावी. परंतु, या सल्ल्याबाबत सिनेमागृह अनुकूल नसल्याचं कळतंय. कारण, यानुसार थिएटरमध्ये आसनव्यवस्था निश्चित केल्यास केवळ २५ टक्के क्षमतेनं सिनेमागृह सुरू होईल. पण, त्यामुळे नुकसान होण्याचीच शक्यता आहे.

### मोफत किंवा स्वस्त तिकीट

येत्या महिन्यात सिनेमागृहं उघडली, तरी मोठा प्रश्न हा आहे की, कोणत्या चित्रपटाचं प्रदर्शन सर्वात आधी करायचं? जेणेकरून सिनेमागृहांबाबत प्रेक्षकांच्या मनात विश्वास निर्माण होईल आणि ते चित्रपटगृहात सिनेमा पाहायला येतील. त्यामुळे थिएटरमालकांकडून एक वेगळी शक्कल लढवली जाण्याची शक्यता आहे. सुरुवातीचे काही दिवस थिएटरमध्ये जुने सुपरहिट चित्रपट पुन्हा प्रदर्शित करुन त्या सिनेमांची तिकीटं प्रेक्षकांना मोफत किंवा एकदम कमी दरात उपलब्ध करून देण्याचा विचार आहे. सध्या 'ड्रीम गर्ल' आणि 'गुड न्यूज'सारखे चित्रपट पुन्हा दुबईमध्ये प्रदर्शित झाले आहेत.

“

सरकारनं अद्याप सिनेमागृहं सुरू करण्यासंदर्भात कोणतीही तारीख जाहीर केलेली नाही. परंतु, अनलॉकच्या तिसऱ्या टप्प्यात सिनेमागृहं सुरू करण्याविषयी सरकार सकारात्मक आहे. अनलॉकचा तिसरा टप्पा पुढील महिन्यापसून सुरू होतोय. सिनेमागृहांत येणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकाच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यासाठी आम्ही पूर्वतयारी केली आहे.

– **कपिल अग्रवाल**, जेएमडी, यूएफओ मुव्हीज